महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३८ दिनांक १८ / ०५ / २०१६

विषय : २० मे २०१६ हा दिवस "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून पाळण्याबाबत.

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.५२७ दि.११.१२.२०१५
२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्र.टीईआर-०५१६/ प्र.क्र.१३६/वि.शा.१-ब, दि.१७ मे २०१६

........

संदर्भिय क्र.१ च्या प्रशासकीय परिपत्रकान्वये सन २०१६ मध्ये राष्ट्रपुरूष/ थोर व्यक्तींचे जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये २१ मे हा दिवस दरवर्षी "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून पाळण्यात यावा अशाही सूचना अंतर्भूतआहेत.

२. आता महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन परिपत्रक क्र.टीईआर-०५१६/ प्र.क्र.१३६/वि.शा.१-ब, दि.१७ मे २०१६ अन्वये दि.२१.०५.२०१६ या दिवशी महाराष्ट्र राज्यात सुट्टी जाहीर केली असल्याने दि.२० मे २०१६ हा दिवस "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून पाळण्याबाबतच्या सूचना पारित केलेल्या आहेत. सोबत दि.१७.०५.२०१६ च्या संदर्भिय परिपत्रकाची प्रत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

३. सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक दि.१७.०५.२०१६ मधील सुचनांचे अवलोकन करून २० मे २०१६ हा दिवस "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून पाळण्याबाबत विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार योग्य ती कार्यवाही करावी.

४. प्रशासकीय परिपत्रक क्र.५२७ दि.११.१२.२०१५ मधील इतर सर्व सूचना अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc

२० मे, २०१६ हा दिवस "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून पाळण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :- टीईआर ०५१६/प्र.क्र.१३६/वि.शा.१ ब**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ मे, २०१६.

**परिपत्रक -**

केंद्रीय गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून दरवर्षी २१ मे हा दिवस "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून पाळण्यात येतो. तथापि ज्या राज्यांमध्ये दिनांक २१.०५.२०१६ रोजी सुट्टी जाहीर केली असेल त्या राज्यांमध्ये दिनांक २०.०५.२०१६ या दिवशी "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" पाळण्यात यावा अशा सूचना केंद्रीय गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिनांक ०२.०५.२०१६ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. दिनांक २१.०५.२०१६ या दिवशी महाराष्ट्र राज्यात सुट्टी जाहीर केली असल्याने दिनांक २०.०५.२०१६ हा दिवस राज्यभर "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून खाली दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे पाळण्यात यावा:-

१) शाळा, महाविद्यालये आणि विद्यापिठे यामध्ये वादविवाद व चर्चा आयोजित करणे.

२) दहशतवाद आणि हिंसाचाराच्या धोक्यासंदर्भात परिसंवाद/चर्चासत्र, व्याख्याने आयोजित करणे.

३) वृत्तपत्रे, नियतकालिक, मासिके, आकाशवाणी आणि दूरदर्शन इत्यादी माध्यमांद्वारे तसेच भित्तीपत्रके आणि पत्रके यामधून योग्यप्रकारे प्रचार करुन, दहशतवाद आणि हिंसाचाराविरुद्ध जनजागृती करण्यासाठी ठोस आणि अविरत मोहिम उघडणे.

४) दहशतवाद आणि हिंसाचाराचे दुष्परिणाम ठळकपणे निदर्शनास आणून देण्यासाठी सामुदायिक शिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी विख्यात क्रिडापटू, चित्रपट अभिनेते आणि अन्य मान्यवर व्यक्तींच्या सहकार्याने इलेक्ट्रॉनिक/मुद्रण माध्यमाचा कल्पक वापर करणे आणि दहशतवाद व हिंसाचार विरोधी घोषणा लिहिलेले टी-शर्ट वाटणे.

५) स्वयंसेवी संघटना, सामाजिक व सांस्कृतिक संस्था यांना व्याख्याने, भाषणे, चर्चा, संगीत व पठणाचे कार्यक्रम आणि सांस्कृतिक समारंभ यांच्याद्वारे कार्यक्रम आयोजित करण्यास सांगणे.

६) दहशतवाद/हिंसाचार विरोधासाठीची ही प्रतिज्ञा सर्व शासकीय कार्यालयांमधून/ सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांमधून व इतर सार्वजनिक संस्थांमधून घ्यावयाची आहे.

२. दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञा मध्यान्हपूर्व वेळेत घ्यावी. प्रतिज्ञेचा नमुना खालीलप्रमाणे आहे :-

**दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाच्या निमित्ताने घ्यावयाची प्रतिज्ञा - "आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तिनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवबंधूमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करु, तसेच मानवी जिवित आणि मूल्ये धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तीचा प्रतिकार करु."**

३. प्रसिद्धी संचालनालयाने निरनिराळ्या प्रसिद्धी माध्यमाद्वारे या कार्यक्रमास प्रसिद्धी द्यावी.

४. सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधितांची मदत घेऊन हा कार्यक्रम आयोजित करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०५१७११४७२४५३२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2016.05.17 11:51:24 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.

२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

४) सर्व मंत्रालयीन विभाग.

५) सर्व विभागीय आयुक्त.

६) सर्व विभाग प्रमुख, महाराष्ट्र शासन.

७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८) सर्व जिल्हाधिकारी.

९) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.

१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

११) सर्व पोलीस आयुक्त.

१२) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.

१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

१४) सामान्य प्रशासन विभाग. (कार्यक्रम मंत्रालयात आयोजित करण्याच्या विनंतीसह)

१५) निवडनस्ती (वि.शा.१ ब).